






Coins Issued by Chandragupta I






॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥


# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक


वर्ष १ : अंक ३ / डिसेंबर २०१३



संग्रहालय : एक शिक्षण केंद्र



इतिहासाचे आरसे : नाणी




पुस्तक परिचय : अज्ञातवासींची बखर

# संपादकीय

ई–प्रशिक्षकच्या या तिसऱ्या अंकात 'संग्रहालयांचा शिक्षणात उपयोग' असा सूत्र विषय घेतला आहे. शिक्षणात पाठ्यपुस्तकांचा वापर अंगवळणी पडला आहे. परंतु विविध प्रकारच्या साधनांचा आणि अध्ययन अनुभवांचा वापर मर्यादितच राहिला आहे. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासात क्षेत्र भेटी, अभ्यास सहली, सर्वेक्षणे यांना मोठे महत्त्व आहे. यामधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतात. अशा अनुभवातून ज्ञानाची निर्मिती होते. हे ज्ञान व्यक्तिनिष्ठ असते. असे ज्ञान विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहते. आवश्यक तेव्हा अशा ज्ञानाचे उपयोजन करता येते.

अभ्यास सहलींमध्ये संग्रहालयांना भेटी हे उत्तम अध्यापन साधन आहे. समाजातील भौतिक साधने, कला व संस्कृती, परंपरा आणि ज्ञान यांचा विकास कसा झाला याचे दर्शन विद्यार्थ्यांना संग्रहालयांद्वारे होत असते. प्रदर्शनांमधून समकालिन परिस्थितीचेही आकलन विद्यार्थ्यांना होत असते.

संग्रहालये आणि प्रदर्शनांच्या भेटींमुळे पाठ्यपुस्तकांना पूरक असे साधन वापरण्याची संधी शिक्षकांना मिळते. त्यामुळे विषय अधिक रुचिपूर्ण होतो. काही वर्षांपूर्वी आलेल्या To Sir With Love या एका कादंबरीत या साधनाचा एका शिक्षकाने कसा उत्तम उपयोग केला याचे वर्णन केले आहे. दक्षिण कर्नाटकात बी.आर.हिल्स या भागातील एका शाळेत परिसराचा इतिहास, संस्कृती, भूगोल, पर्यावरण याचा परिचय करून देणारे संग्रहालय पाहण्यात आले. संग्रहालयाची निर्मिती विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने केली होती. परिसराचा उत्तम परिचय करून देण्याचे एक शैक्षणिक साधनच मुलांनी प्रकल्प म्हणून उभे केले होते. या प्रकल्पातून विद्यार्थी खूप काही शिकले असतील.

युरोप – अमेरिकेत अनेक संग्रहालये आणि कला प्रदर्शने लोकशिक्षणाची साधने म्हणून उभी राहिली आहेत. लक्षावधी लोक त्यांना भेटी देत असतात. शाळा–महाविद्यालयांच्या सहली योजल्या जातात. त्यासाठी संग्रहालयांमार्फत विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी कार्यपुस्तिका, छोट्या भेटी (Gift), नमुना–प्रतिकृती तयार केल्या जातात. या सर्व प्रयत्नांतून ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती होत असते.

आपल्या देशातही या प्रक्रियेला चालना मिळावी यासाठी ज्ञान प्रबोधिनीमार्फत प्रयत्न होत आहेत. याबाबतचे तुमचे अनुभवही आम्हाला जरूर कळवा.

विवेक पोंक्षे

# संग्रहालय : एक शिक्षण केंद्र

संग्रहालय, कलादालन या समाज शिक्षणासाठी निर्माण झालेल्या रचना आहेत. या ठिकाणी संग्रह करणाऱ्याचे शिक्षण तर होतेच पण त्याबरोबर संग्रह वा प्रदर्शन पहायला येणाऱ्या व्यक्तीच्या माहितीत भर घालण्याचे व व्यक्तीची दृष्टी व्यापक करण्याचे कार्य कळत नकळत होत असते. संग्रहालय हे समाज शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र आहे. कलादालनात एका विशिष्ट विषयापुरती, तात्पुरत्या स्वरूपात प्रदर्शनीय संग्राह्य वस्तूंची मांडणी केलेली असते तर संग्रहालयात ही मांडणी कायमची व रचनाबद्ध असते.

कौटुंबिक सहली असोत वा शालेय सहली असोत, सहलीच्या कार्यक्रमात एखाद्या संग्रहालयाला भेट देण्याची योजना असतेच. संग्रहालये ही राष्ट्रीय वारसा जपणारी स्थाने आहेत. संग्रहालयात मानवी इतिहास व संस्कृतीच्या खुणा सांगणाऱ्या वस्तू असतातच पण या खुणा शोधणारे, गोळा करणारे, त्याचा अभ्यास करणारे अभ्यासक पण असतात. खरे तर संग्रहालय हे मुक्त शिक्षणाचे सर्वोत्तम ठिकाण आहे. या ठिकाणी प्रवेश करण्यासाठी कोणतीही शिक्षणाची वा वयाची अट नसते. संग्रहालयात व्यक्ती मुक्तपणे त्याला हवा तेवढा वेळ घेत वस्तू पाहात, माहिती वाचत फिरू शकते. संग्रह पाहताना पाहणारा माहितीने समृद्ध होतोच त्याबरोबर संग्रहालयातून फिरताना जो विचार होतो, जे चिंतन होते त्यामुळे ज्ञान, विचार आणि भावना समृद्ध होतात.

## संग्रहालयाचे प्रकार

१. इतिहास संग्रहालय : इतिहास संग्रहालय पाहताना व्यक्ती, वस्तू, ठिकाण यांचा परिचय करून घेत आपण घटनेचा अभ्यास करतो. वस्तू, हत्यारे, कागदपत्रे पाहात मानवी संस्कृती, राजेराजवाडे यांचा भूतकाळातील प्रवास आपण माहीत करून घेतो.





२. उत्क्रांती इतिहास संग्रहालय : खडक, स्फटिक, मासे, पक्षी, सरीसृप प्राणी, जीवाश्म नमुने पाहताना पृथ्वीची निर्मिती ते मानवाची उत्क्रांती, जैवविविधता यांची मांडणी केलेली असते.

४. सजीव संग्रहालय : वनस्पती उद्यान, प्राणी संग्रहालय, सर्पोद्यान, मत्स्य संग्रहालय यासारखी ठिकाणे विद्यार्थ्यांना जीवसृष्टीचा परिचय करून देण्यासाठीची महत्त्वाची ठिकाणे आहेत. वनस्पती व प्राणी यांची शरीररचना, हालचाली, त्यांचे सहसंबंध अशा अनेक गोष्टींचे दर्शन घडवण्यासाठी ही संग्रहालये अभ्यासकांसाठी महत्त्वाची ठिकाणे आहेत.





५. विशेष संग्रहालय : अभ्यास संस्थांची संस्था अंतर्गत संग्रहालये विशेष परवानगी घेऊन पाहता येतात. सैन्यदल, रेल्वे, संरक्षण विभाग इ. यासारख्या विशेष खात्यांची संग्रहालये तसेच विशेष वेगळ्या वस्तूंची मांडणी असलेली विशेष संग्रहालये. उदा. बाहुली संग्रहालय, विज्ञान केंद्र, इ.

६. अंतर्जालावरील संग्रहालये : वेळ, अंतर आदीचा विचार करता जगभरातील संग्रहालये घरबसल्या पाहता यावीत यासाठी अंतर्जालावर 'व्हर्चुअल संग्रहालये' पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.



## संग्रहालय भेटीची उद्दिष्टे :

१. संग्रह पाहताना विद्यार्थी मांडलेल्या वस्तूंचे निरीक्षण करतो. त्या वस्तूचे दिलेले वर्णन व प्रत्यक्ष वस्तू यांची तुलना करतो. प्रदर्शनातील दोन वस्तूंची तुलना करून त्यांच्यातील साम्य-भेद शोधतो.
२. संग्रहालयात वस्तूंची मांडणी विशिष्ट क्रमाने केलेली असल्याने मांडणीसंदर्भात वस्तूंच्या विशेष गुणधर्मात होणारे बदल, त्यांचा होत जाणारा विकास, वस्तूंचे गुणधर्म शोधणे व त्यांचे वर्गीकरण ही कौशल्ये विद्यार्थी शिकतात.
३. एका मोठया कालखंडाचे व वस्तूंच्या संग्रहाचे संकलन करण्याचे कौशल्य शिकतात.

## संग्रहालय भेटीचे नियोजन :

शालेय सहलींमध्ये बरेचदा संग्रहालय भेट योजलेली असते. पण आपण येथे कशासाठी आलो आहोत? काय व का पाहणार आहोत याची कल्पना बरेचदा विद्यार्थी व शिक्षक या दोघांच्या मनात स्पष्ट नाही असे जाणवते. विद्यार्थी

अनियंत्रित पद्धतीने फिरत असतात किंवा वर्णन फलकावरील माहिती वहीत उतरवून घेत असतात असे दिसते. संग्रहालयाला भेट देण्याचे योग्य नियोजन केल्यास हा एक उत्तम शैक्षणिक अनुभव ठरू शकतो. यासाठी तीन टप्प्यांवर संग्रहालय भेटीचे नियोजन करावे.

## भेटीची पूर्वतयारी:

संग्रहालय भेटीपूर्वी विद्यार्थ्यांच्या मनात भेटीबद्दलची उत्सुकता व कुतूहल निर्माण करणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना संग्रहालय भेटीच्या नियोजनात सहभागी करून घेतल्यास त्यांचा भेटीतील सहभाग सकारात्मक राहील. संग्रहालयात ज्या वस्तूंची मांडणी केली आहे त्या अनुषंगाने योग्य ती माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यासाठी विशेष व्याख्यानांची योजना करावी. भेटीसाठी महत्त्वाचे ठरतील असे काही प्रश्न विद्यार्थ्यांना काढण्यास सांगावेत.

भेटीपूर्वी शक्य असेल तर अध्यापकाने संग्रहालयाला पूर्वभेट द्यावी. पूर्वभेट देणे शक्य नसेल तर संग्रहालयाचे संकेतस्थळ पाहावे. संग्रहालयामार्फत प्रकाशित माहितीपुस्तिका, छायाचित्रपुस्तिका, भेटकार्ड आदी साहित्य मागवून घ्यावे.
संग्रहालय भेटीची वेळ संग्रहालयाचे सुट्टीचे दिवस विचारात घेऊन निश्चित करावी. त्यादृष्टीने आधी पत्रव्यवहार करावा. संग्रहालयाला भेटीच्या दरम्यान मार्गदर्शक देण्याची व संग्रहालयातील तज्ज्ञाची मुलाखत घेऊ देण्याची विनंती करावी. भेटीच्या शुल्कात विद्यार्थी सवलत देण्याची विनंती करून शुल्कात सवलत मिळवावी.

## भेटीच्या दरम्यान:

विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना संग्रहालयात फिरण्याचा मार्ग निश्चित करून द्यावा. गटप्रमुख ठरवून त्यांनी कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी पाहायच्या आहेत, त्यांची वैशिष्ट्ये नोंदवायची आहेत याची यादी त्यांना द्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक वस्तूबद्दल माहिती नोंदवणे गरजेचे नाही. गटाकडे सर्व माहिती गोळा होईल याची काळजी घ्यावी.

विद्यार्थ्यांना माहिती नोंदवण्यासाठी एक नोंदपत्रक द्यावे. त्यात त्याला आवडलेल्या व भावलेल्या कोणत्याही पाच वस्तूंचे वर्णन त्याच्या शब्दांत लिहिण्यास सांगावे. त्याचे पेन्सीलने कच्चे आरेखन करण्यास सांगावे. संग्रहालयातील भेटीचा ६० टक्के वेळ नियंत्रित असावा तर ४० टक्के वेळात विद्यार्थ्यांना संग्रहालयात मुक्तपणे फिरू द्यावे.

संग्रहालयातील वस्तूंची छायाचित्रे वा संग्रहालयामार्फत प्रकाशित छायाचित्र-पुस्तिकेतील चित्रे देऊन त्या वस्तूंचे दालन शोधणे किंवा खजिना शोध यासारखे खेळ योग्य नियोजन केल्यास घेता येतील.

## भेटीनंतर:

भेटीनंतर विद्यार्थ्यांना भेटीचा सचित्र अहवाल तयार करण्यास सांगावा. संग्रहालयासंदर्भात पर्यटन माहितीपत्रक तयार करणे, ऑडीयो-व्हिडियो गाईड तयार करणे यासारखी कामे विद्यार्थांना देता येतील. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी प्रश्नोत्तराचे सत्र योजावे. संग्रहालयाला व भेटीसाठी मदत केलेल्यांना आभारपत्रे पाठवावीत. संग्रहालय, कलादालन या समाज शिक्षणासाठी निर्माण झालेल्या रचना आहेत. शाळेमार्फत औपचारिकपणे संग्रहालय व प्रदर्शने पाहण्याची योजना आखावीच पण त्याबरोबर पालकांचा सहभाग घेऊन एक कौटुंबिक शैक्षणिक सहल पालक आपल्या पाल्यासाठी योजतील असा आग्रह धरावा. विद्यार्थ्याने संग्रहालय, कलादालन व प्रदर्शन पालकांबरोबर पाहिल्यास समाज शिक्षणाचे संग्रहालयाचे उद्दिष्ट साध्य होईल. कारण या शिक्षणकेंद्रात प्रवेशासाठी वयोगटाचा भेद नाही. आकारिक मूल्यमापनात पालकांचा सहभाग वाढवण्यासाठी अशा कौटुंबिक भेटी उपयोगी ठरतील. संग्रहालय अथवा प्रदर्शन भेटीची योजना आखा व आपले अनुभव लिहून प्रकाशित करण्यासाठी प्रशिक्षकाकडे जरूर पाठवा.

प्रशांत दिवेकर
समन्वयक
वा.ना.दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे

# इतिहासाचे आरसे : नाणी

आजच्या आधुनिक युगात पैशाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'सबसे बडा रुपैया' म्हणतात ते उगीचच नाही. पण एक काळ होता त्यावेळी पशुप्राणीच काय माणसंदेखील नाणी म्हणून वापरली जात. मग सुरुवात झाली वस्तुविनिमयाची. नाण्यांचा शोध ही मानवी विश्वातील महत्त्वाची घटना. नाण्यांचे महत्त्व अद्यापही टिकून आहे. आज नाणी म्हटली की आपल्यासमोर येतात गोल, चकचकीत, सुबक अशी आधुनिक धाटणीची नाणी. परंतु नाण्यांचे हे आधुनिक रूप यायला सुमारे २७०० वर्षांचा कालावधी लागला. इ.सन पूर्व ७००–६०० मध्ये भारतात गांधार, तुर्कस्थानात लिडिया येथे व चीनमध्ये नाण्यांची सुरुवात झाली. त्यानंतर सुमारे २७०० वर्षांमध्ये कित्येक राजे व राजघराणी उदयास आली. या सर्वांनी हजारो नाणी पाडली. या सर्व प्रकारच्या नाण्यांचा अभ्यास नाणकशास्त्रात होतो. नाण्यांद्वारे आपणास तत्कालीन आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीचे आकलन होते. नाणकशास्त्रामध्ये नाण्यांच्या या विविधांगी पैलूंचा अभ्यास करून इतिहास शोधता येतो. नाणकशास्त्र ही पुरातत्त्वशास्त्र विद्येची शाखा म्हणून गणली जाते. नाणी बहुआयामी असतात, नाण्यांद्वारे इतिहासातील निखळलेले दुवे मिळवून सलग इतिहास उभा करता येतो.

भारतामध्ये भाषिक, भौगोलिक, जैविक विविधता आहे. नाणीही याला अपवाद नाहीत. त्यामुळे भारतीय नाणकशास्त्र हे अत्यंत संपन्न व प्रगल्भ असे गणले जाते. आपल्याला अभिमान वाटावा की, भारतातील विजयनगर साम्राज्याने सुमारे ०.०३० ग्रॅम वजनाचे तसेच मुघल बादशहा जहांगीर औरंगजेब यांनी सर्वाधिक किंमतीची (१०० मोहोर) व सुमारे १३ ग्रॅम वजनांची सुवर्णनाणी पाडली. ही नाणी जगातील सर्वांत कमी व सर्वाधिक किंमतीची सुवर्णनाणी म्हणून ओळखली जातात. भारतातल्या कारागिरांनी ही किमया सुमारे ४०० वर्षे आधी घडवली ही नक्कीच मानाची गोष्ट ठरू शकते. नाण्याच्या विविध पैलूंमुळे त्यांना भूतकाळाचा आरसा म्हणतात ते काही उगाच नाही. पुरातात्त्विक उत्खननांमध्ये नाण्यांचा उपयोग कालनिर्धारणासाठी होतो. नाणी तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या धातूंच्या प्रमाणांच्या अचूकतेवरून तत्कालीन धातुविज्ञानाची प्रगती व आर्थिक संपन्नेची माहिती मिळते.

कमी अधिक किंमतीच्या नाण्यांत चांदी सोन्यासारखे धातू वापरताना त्यांचे विनिमयमूल्य आणि धातूची किंमत यांची सांगड घातली जात असे याचा अभ्यासही नावीन्यपूर्ण ठरतो. मध्ययुगात विशेषतः नवव्या ते अकराव्या शतकात चांदीची टंचाई झालेली आढळते. त्यामुळे विशेषतः सोन्याची लक्ष्मी छाप नाणी व नंदी–घोडेस्वार असणारी चांदी व तांब्याची नाणी उत्तर भारतात मोठ्या प्रमाणावर पाडल्याचे आढळते. नाण्यांमध्ये वापरण्यात आलेल्या धातूंमधील हीन धातूंचे वाढलेले प्रमाण हे राजकीय अराजकता व राज्याच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थितीचे द्योतक असते. साम्राज्याचा विस्तार तसेच साम्राज्यांतर्गत असणाऱ्या वसाहतींचा बोध नाण्यांमुळे होतो.

पुराभिलेख विद्येच्या (Epigraphy) दृष्टीकोनातून नाण्यांना फार महत्त्व आहे. असंख्य लिपी व भाषा यांच्या शोधात नाण्यांचे योगदान अतुलनीय आहे. यासंबंधीची एक छोटीशी आख्यायिका अशी - एकदा सम्राट अकबराने कुतुबमिनार परिसरातील लोहस्तंभावरील अभिलेखांचे वाचन करण्यासाठी संपूर्ण भारतातून तसेच भारताबाहेरूनही विद्वानांना पाचारण केले. बऱ्याच जणांनी प्रयत्न करून कोणालाही या अभिलेखांचे वाचन करता आले नाही. पुढे १८३० मध्ये जोसेफ प्रिन्सेस या ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या कोलकत्ता टाकसाळीत काम करणाऱ्या ॲसेमास्टरने, त्याने संग्रहित केलेल्या काही इंडो-ग्रीक राज्यांच्या नाण्यांवरील भाषिक लेखांचे यशस्वीरीत्या वाचन केले. यामुळे ब्राह्मी व खरोष्टी या विस्मरणात गेलेल्या प्राचीन भारतीय लिपींचा बोध झाला व या घटनेने भारतीय इतिहासातील एक नवीन दालन उघडले गेले.

बरेचदा प्राचीन परदेशी नाणी विशेषतः रोमन नाणी भारतात मोठ्या प्रमाणावर सापडतात. या नाण्यांद्वारे आपल्याला तत्कालीन परदेशी व्यापाराची व्याप्ती कळते. नाण्यांवरील धार्मिक प्रतीकांवरून आपल्याला काही विशेष घटनांचा आढावा घेता येतो. मोहम्मद घोरी व सम्राट अकबर यांनी अनुक्रम लक्ष्मी व रामसीता यांना आपल्या नाण्यांवर स्थान देऊन धार्मिक सहिष्णुतेचा स्वीकार केलेला आढळतो. पराजित राजांच्या नाण्यांवर विजयी सम्राटांनी आपले नाव पुनर्टंकित करण्याच्या प्रथेमुळे आपणांस इतिहासातील काही महत्त्वाच्या घटनांची सत्यता पडताळून पाहता येते. उदा. नाशिकच्या लेण्यांमधील गौतमीपुत्र सातकर्णी या सातवाहन राजाने शकक्षत्रप नहापान याचा पराभव केल्याचा उल्लेख

आहे. १९३० मध्ये नाशिकजवळील जोगल रेंभी येथे नहापानाच्या १७००० नाण्यांचा संचय सापडला. या संचयातील १४००० नाणी गौतमीपुत्राने पुनर्टंकित केल्याचे आढळते.

शिवकालीन महाराष्ट्रात विशेषतः शिवाजी महाराजांच्या काळात शहाजीराजांना 'राजा' ही पदवी मिळाली असल्यामुळे शिवरायांनी राज्याभिषेकापूर्वीपासून स्वतःला 'राज' म्हणवून घेतले. त्यानुसार त्यांनी होन व शिवराई ही नाणी पाडली होती. मात्र या नाण्यांवर 'छत्रपती' हा शब्द नव्हता. त्याखेरीज अर्ध्या होनाचे निमहोन किंवा प्रताप हे नाणे प्रसिद्ध होते. शिवाजी महाराजांनी पाडलेला एक चांदीचा रुपया अत्यंत दुर्मीळ आहे. या रुपयाच्या एका बाजूवर 'राजा शिव' व दुसऱ्या बाजूस 'जगदंबा प्रसन्न' असे लिहिलेले आहे. शिवाजी महाराजांनी अठरा कारखान्यांची स्थापना केली. हे कारखाने छत्रपती जेथे जात तिथे नेले जात. यापैकी टांकसाळ हा एक कारखाना असे. याखेरीज पेशवाईमध्ये पुण्याच्या टांकसाळीत अंकुशाचे चिन्ह असलेला रुपया पाडला होता. तो अंकुशी रुपया म्हणून ओळखला जाई. नाणी ज्या गावात पाडली जात, त्या गावाच्या नावाने ओळखली जात. उदा. औरंगाबादी, चांदवडी, पेडगावी, पन्हाळी, देहदंडी, सुरती रुपयाची नाणी. पुढे इंग्रजांच्या काळात यंत्राद्वारे नाणी पाडली जाऊ लागली.

नाण्यांची पार्श्वभूमी ठरवताना नाण्यांवरील अभिलेखाची भूमिका महत्त्वाची असते. अभिलेखाच्या लिपीवरून व अभिलेखाच्या वाचनाने नाण्याचा संदर्भ ठरवताना मदत होते. काही नाण्यांवर कालोल्लेख असतो. विविध कालगणनांच्या आधारे कालनिर्धारण केले जाते. उदा. मुघल नाण्यांवर हिजरी संवतात वर्षाचा उल्लेख असतो. तसेच बऱ्याचदा यावर टांकसाळीचे नाव व टांकसाळीची चिन्हेही आढळतात. याशिवाय नाण्यांवरील प्रतिके, चिन्हे, आकृत्या व विशेषतः राजचिन्हे ही नाण्यांचा संदर्भ ठरवताना महत्त्वाची ठरतात. नाण्यांचे अभ्यासक व अभ्यास करणाऱ्या संस्था वरील विविध तपशीलांचा अभ्यास करून त्याची माहिती देणारे सचित्र संग्रह (catalog) प्रसिद्ध करतात.

या कॅटलॉग्जद्वारे आपणांस नाण्यांची पार्श्वभूमी समजावून घेताना व त्यांचा अभ्यास करताना मदत होते.

नाण्यांचा संग्रह करताना काही प्राथमिक गोष्टींची माहिती करून घेणे जरुरीचे असते. नाण्यांचा संग्रह करणे सुरु करण्याआधी एखादा विषय (Theme) निवडावा व त्याच्याशी निगडित नाणी जमविल्यास त्यांची माहिती मिळविणे व अभ्यास करणे सोईचे जाते. उदा. काही संग्राहक फक्त मुघलांची नाणी गोळा करतात, तर काही फक्त अकबर या राजाची विविध टांकसाळीतून पाडलेली नाणी गोळा करतात. विविध देशांची नाणी गोळा करीत असताना आपल्याला त्या देशांची प्रतिके, चलनाचीही माहिती मिळते. ही माहिती आपण जर त्या नाण्यांबरोबर जोडली तर, पुढे त्या प्रकारची नाणी आपल्याला ओळखायला फारसा त्रास होत नाही. अशी नाणी आपल्याला जुन्या बाजारात चक्कर मारताना तसेच परदेशी जाणाऱ्या मित्रमंडळीकडून आणि नातेवाईकांकडून मिळू शकतात. कुठल्याही प्रकारची नाणी विकत घेताना ती चांगल्या प्रतीची आहेत की नाही याची शहानिशा करूनच घ्यावी. बऱ्याचदा बाजारात काही नाणी दुर्मीळ म्हणून विकली जातात. अशा वेळी या नाण्यांच्या किंमतीविषयी अनुभवी व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्यावे. अशी नाणी जर पूर्वी हाताळली असतील किंवा बघितली असतील तर ती विकत घेताना आपली फसवणूक होत नाही. आपण गोळा करीत असलेल्या विषयाशी (Theme) निगडित माहितीचे संकलन करणे नेहमीच चांगले. अशी माहिती वेळोवेळी आपल्याला फायद्याची ठरते. नाण्यांचा संग्रह करताना त्यांच्या साठवणुकीसाठी बाजारात नाण्यांचे अल्बम मिळतात. अशा अल्बममध्ये नाणी विषयवार कालक्रमान्वये मांडून त्यांची माहिती जोडल्यास ती वर्षानुवर्षे व्यवस्थित राहतील. नाण्यांना, पाणी, धूळ, रसायने यांपासून दूर ठेवावे. नाणी साफ करताना कोमटपाणी व साबण याव्यतिरिक्त दुसरे रसायन शक्यतो वापरू नये.

एखाद्या विशिष्ट विषयाशी निगडित नाणी गोळा करीत असताना आपल्याला बऱ्याचदा त्याचा पाठपुरावा करावा लागतो. अशा वेळी चिकाटीची गरज असते. उदा. मला साताऱ्यातील पहिल्या शतकातील कुमार राजवंशाची नाणी मिळविण्यासाठी कित्येक महिने वेगवेगळ्या गावांना भेटी द्याव्या लागल्या.

बऱ्याचदा निराशाही पदरी पडत असे. अखेर सहा महिन्यांनी मला वाईमध्ये या प्रकारची नाणी मिळाली. या चिकाटीचे फळ म्हणून दरम्यानच्या माझ्या भटकंतीत काही दुर्मीळ नाण्यांची भर माझ्या संग्रहात पडली.
महाराष्ट्रामध्ये नाशिकजवळील अंजनेरी येथे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च इन न्युमिसमेटीक स्टडीज' ही संस्था नाणकशास्त्र विषयक संशोधन करत असते व तेथे आपल्याला मोफत मार्गदर्शन मिळते. ही संस्था नाणकशास्त्राशी निगडित विषयांवर नियतकालिके व पुस्तके प्रकाशित करत असते तसेच नाणकशास्त्राशी संबंधित अल्पमुदतीचे अभ्यासक्रमही घेते. या संस्थेच्या आवारात समृद्ध असे नाणकशास्त्रीय संग्रहालयही आहे.

नाणे संग्रहाच्या विविध संघटना भारतातील प्रमुख शहरांमध्ये कार्यरत आहेत. अशा संघटनांचे सदस्यत्व घेतल्याने आपल्याला विविध विषयांवर मार्गदर्शन मिळू शकते. आपल्याला हवी असणारी नाणी कुठे मिळतील, कशी मिळतील

यांची माहितीही मिळते. तसेच इतर सदस्यांशी नाण्यांची अदलाबदल करून आपण आपला संग्रह वाढवू शकतो. या संघटना वेळोवेळी नाण्यांचे प्रदर्शन भरवतात. अशा प्रदर्शनांना भेट दिल्यास आपल्याला नवनवी माहिती मिळते. तसेच नाण्यांविषयी  विविध लेख वृत्तपत्रे, नियतकालिकांमध्ये येत असतात. अशा लेखांचा संग्रह केल्यास भविष्यात ही माहिती फायदेशीर ठरू शकते.

आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग आहे. नाण्यांविषयी माहिती देणारे ग्रुप्स व वेबसाईटस् इंटरनेटवर कार्यरत असतात. ही महिती विनामूल्य असते. अशा काही वेबसाईट्सची सूची या लेखाच्या शेवटी दिलेली आहे.

शालेय स्तरावर बरेच विद्यार्थी केवळ छंद म्हणून नाण्यांचा संग्रह करत असतात. पुरेशा नाण्यांचा संग्रह झाल्यावर अशा नाण्यांचे प्रदर्शन भरवायला हरकत नाही. या प्रदर्शनामुळे इतरांना या नाण्यांविषयी माहिती तर मिळतेचय पण इतरांकडून विशेषतः तज्ज्ञांकडून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे संग्राहकाच्याही नाण्यात भर पडते. आधी काही प्रदर्शने बघितली असल्यास नाणी कशी मांडावीत, माहिती कशी मांडवी याची पूर्वकल्पना मिळते. नाण्यांवर प्रकाशित झालेल्या पुस्तकांमध्ये मराठीमधील 'प्राचीन भारतीय नाणकशास्त्र' हे म. के. ढवळीकर यांचे पुस्तक संग्राह्य आहे.


नाणी जमवणे हा छंद आपले सामान्यज्ञान तर वाढवतोच पण या छंदातून आपला व्यक्तिमत्त्व विकासही घडतो. अशा नाण्यांचा संग्रह करून 'नाणे-संग्राहक' म्हणूनही  तुम्हाला नाव मिळवता येईल. एक चांगला ज्ञानदायी छंद आपल्या आयुष्यात बऱ्याच नव्या गोष्टींची सुरुवात करून देईल.

अमोल बनकर
ज्ञान प्रबोधिनी, पुणे
छात्र प्रबोधन अंकातून पुनर्मुद्रित
पौष १९२८, जानेवारी २००७

### वेबसाइट सूची

Ancient Coin Museum - www.ancientcoinmuseum.com
British Museum - Coins and Medals - www.britishmuseum.org/about_us/departments/coins_and_medals.aspx
Coinage - Ancient India Coinage - www.rbi.org.in/currency/museum/c-ancient.html
National Museum of American History - www.americanhistory.si.edu/collections/subjects/coins-currency-and-medals
Coin Museum - Maharashtra - www.maharashtratourism.net/museums/coin-museum.html
Indian Coins - www.bharatcoins.com and coinsindia.info
COIN TERMS - www.cointerms.hypermart.net

# पुस्तक परिचय




## पुस्तक परिचय सारांश

राजा केळकर संग्रहालयाचे संस्थापक पद्मश्री कै. डॉ. दि. गं. केळकर यांचा संग्रहालयातर्फे चरित्र ग्रंथ प्रकाशित केला आहे. 'अज्ञातवासींची बखर' या पुस्तकाचे लेखन सौ. विनीता ऐनापुरे यांनी केले आहे.

दिनकर केळकरांनी सारा भारतवर्ष अनेकदा हिंडून असंख्य ऐतिहासिक वस्तू जमा केल्या. राजा केळकर संग्रहालयातील संग्रह पाहिला की एका संग्रह करण्याच्या छंदाचे भारताच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशात रूपांतर झालेले लक्षात येते. 'अज्ञातवासींची बखर' म्हणजे एका छंदाची कथा. भारताचा सांस्कृतिक इतिहास जपण्यासाठी दिनकर केळकरांनी केलेली तन,मन,धनाची कहाणी म्हणजे 'अज्ञातवासींची बखर'. राजा केळकर संग्रहालय उभारणीची कथा आणि एक वेड जगणाऱ्याची जीवनकहाणी आपणापर्यंत आणि आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचायलाच हवी.

www.rajakelkarmuseum.com




## पुण्यातील संग्रहालये

१. आदिवासी संग्रहालय
द्वारा– आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, क्विन्स गार्डन, कॅम्प, पुणे – ४११ ००१
संपर्क– ०२०–२६३६२०७१

२. राष्ट्रीय चित्रपट संग्रहण संग्रहालय (NFAM)
भारत राष्ट्रीय चित्रपट संग्रहण, पो. ऑ. बॉक्स नं –८१०, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११ ००४
संपर्क– ०२०–२५६५२२५९ इ–मेल– nfaipune@gmail.com

३. राजा दिनकर केळकर संग्रहालय – १३७७–७८, नातू बाग, बाजीराव रोड, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
संपर्क– ०२०–२४४६१५५६ , २४४८२१०१, २४४७४४६६

४. आंबेडकर संग्रहालय – एस. बी. रोड, पुणे, महाराष्ट्र

५. महात्मा फुले संग्रहालय – शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र. संपर्क– ०२०–२५५३२७५०

६. जोशी यांचे रेल्वे संग्रहालय – १७६१, जी. ए. कुलकर्णी रोड, करिष्मा सोसायटीजवळ, कोथरूड, पुणे ४११०२९
वेळ – शुक्रवार स. ८ ते ५.

७. भूमी अभिलेख संग्रहालय – दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, कौन्सिल हॉलसमोर, ससून रोड, पुणे ४११००१, महाराष्ट्र

८. आगाखान राजवाडा संग्रहालय – नगर रोड, पुणे ४११००६ महाराष्ट्र

९. लोकमान्य टिळक संग्रहालय – नारायण पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र

१०. विश्रामबाग वाडा संग्रहालय – कुमठेकर रोड, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

११. पर्वती संग्रहालय – सारसबाग, २१७०, सदाशिव पेठ, पुणे,४११०३० महाराष्ट्र संपर्क– ०२०–२४४२ ३५२०.

१२. डेक्कन कॉलेज : पुरातत्त्व संग्रहालय – डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे –४११ ००६. महाराष्ट्र
संपर्क – ०२०–२६५१ ३२०४, २६५१३२४१ / ३७

१३. सैन्य अभियांत्रिकी महाविद्यालय संग्रहालय – दापोडी/खडकी (किरकी), पुणे

१४. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी संग्रहालय

१५. बॉटानिकल सर्वे ऑफ इंडिया संग्रहालय शास्त्रज्ञ–प्रभारी, भारत वनस्पातिज सर्वेक्षण, पाश्चात्य प्रादेशिक केंद्र. ७, कोरेगाव रोड, पुणे–४११००१ दूरध्वनी / फॅक्स: ०२०–२६१२ ४१३९ फोन ०२०–२६१२ २१२५, २६१३ ९५१२.

१६. सर्पोद्यान व राजीव गांधी प्राणी संग्रहालय पुणे–सातारा हायवे, भारती विद्यापीठजवळ, कात्रज, पुणे

## महाराष्ट्रातील प्रमुख संग्रहालये

१. नागपूर मध्यवर्ती संग्रहालय ( अजब बंगला ), नागपूर विधानसभा भवनजवळ, आणि भारतीय विद्या भवनजवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर,४४०००१ महाराष्ट्र

२. श्री छत्रपती शाहू संग्रहालय, कोल्हापूर नवीन पॅलेस संग्रहालय, भवानी मंडप, कसबा बावडा रोड, कोल्हापूर

३. सिद्धगिरी ग्रामीण जीवन संग्रहालय सिद्धगिरी मठ (कणेरी मठ), कोल्हापूर–४१६००१ संपर्क– ०२३१–२६७२३८०

४. रणगाडा संग्रहालय, अहमदनगर इवले नगर, अहमदनगर, ४१४११० महाराष्ट्र वेळ– शुक्रवार सकाळी ८ ते ५

५. भाऊ दाजी लाड संग्रहालय, मुंबई. ९१–अ, राणी बाग, वीर जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, भायखळा पूर्व, मुंबई, ४०००२७ महाराष्ट्र संपर्क– ०२२–२३७३ १२३४

६. मणिभवन संग्रहालय १९ लॅबर्नम रोड, गावदेवी, ग्रांट रोड, नाना चौक, मुंबई संपर्क– ०२२–२३८०५८६४

७. नॅशनल ग्यालरी ऑफ मॉदेर्न आर्ट, मुंबई अ. सर कावसजी जहांगीर पब्लिक हॉल, एम जी रोड, फोर्ट, मुंबई–३२
संपर्क– ०२२–२२८८ १९६९
ब. एस. सी. जे. पब्लिक हॉल, प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय समोर, एम जी रोड, फोर्ट, मुंबई–३२

८. आय.एन.स. विक्रांत, मुंबई कोलाबा, फोर्ट, मुंबई

९ छ. शिवाजी महाराज संग्रहालय,(जुने प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय) फोर्ट,एम जी रोड, फोर्ट, मुंबई–३२
संपर्क– ०२२–२२८४ ४५१९

१०. सुनेहरी महाल ,डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर अंतर्गत स्थित औरंगाबाद

११. छत्रपती शिवाजी संग्रहालय, हिमायत बाग, औरंगाबाद, महाराष्ट्र– ४३१ ००१

१२. गारगोटी संग्रहालय, मालेगाव डी ५९, एमआयडीसी, मालेगाव औद्योगिक क्षेत्र, मालेगाव, सिन्नर,४२२११३ महाराष्ट्र
फोन ०२५५१–२३०८६५, ९८९०६५५५९२

१३. श्री भवानी संग्रहालय, औंध, तालुका– खटाव, जिल्हा– सातारा. संपर्क– ०२१६१– २६२ २२५

१४. महाराष्ट्र राज्य सरकारद्वारा संचलित संग्रहालये : पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, सिंधखेड राजा, सातारा, सांगली, माहूर, ई.


# What's New at: www.erc-pune.org




**Online Practice Question Banks & Question papers for TET**

www.erc-pune.org/en/resources/teachers-eligibility-test

**Experts Discussion**
**Examination preparation and Evaluation**


10th Class preparation


Exam preparation


coin museum

## Virtual Museum Tours Visit

1 Smithsonian National museum of natural history
http://www.mnh.si.edu/vtp/1-desktop
2 .The Louvre museum :http://www.louvre.fr/en/visites-en-ligne
3.British museum
http://www.britishmuseum.org/explore/online_tours.aspx
4. The Holocaust History Museum
http://www.yadvashem.org/yv/en/museum/virtual_tour.asp
5. museum of world war
http://www.museumofworldwarii.com/virtual-tour
6. http://www.google.com/culturalinstitute/project/art-project
7. virtual tour of Van Gogh's Van Goghs
http://www.nga.gov/exhibitions/vgwel.htm
8. http://www.virtualfreesites.com/museums.museums.html
http://www.sciencemuseum.org.uk/
http://fieldmuseum.org/
9. Geology
http://www.cas.miamioh.edu/limpermuseum/students/lgmvirtualtourst udents.html
http://fundygeological.novascotia.ca/

## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org

**Visit us at: www.erc-pune.org**